केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आयुष्यमान भारत आरोग्य पायाभूतसुविधा अभियानाकरिता सन २०२६-२७ मधील मंजूर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील मुळ तसेच पावसाळी आधिवेशनातील पुरक मागणीतील तरतूदीमधून सामाजिक विशेष घटकाकरीता अनुदान राज्य आरोग्य सोसायटीस वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्र. पुरमा-३४२६/प्र.क्र.२२०/एनएचएम सं.क्र.१६७१०९३

१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकूल इमारत

नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.

दिनांक : २१ ऑगस्ट, २०२६

<u>वाचा :-</u>

१) केंद्र शासनाचे पत्र क्र.D.O.No.७/४८/२०२०-NHM-I दि.१/११/२०२१

२) केंद्र शासनाचे मंजूरी आदेश क्र. G.२७०१८/०४/२०२६-२७/NHM-F (FTS:८३९९४६०), दि.०६.०८.२०२६

३) शासन निर्णय, प्रशामा-१२२२/प्र.क्र.१६/२२/आरोग्य-७, दि.३०/०९/२०२२

४)वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३ दि.०९.०४.२०२६

५) शासन निर्णय क्र. संकीर्ण - २०२४/प्र. क्र.५४/कोषा प्रशा-४ दि.२३.०४.२०२५

६) केंद्र शासनाचे पत्र क्र. File No. Z-१८०१५/७२/२०२५-NHM-II दि.२८.०४.२०२६

७) वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३ दि.०७.०५.२०२६

८)वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.६१/अर्थ-३ दि.०३.०७.२०२६

९) सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, शासन परिपत्रक क्र.बीयुडी-२०२५/प्र.क्र.१०५/अर्थसंकल्प, दि.१९.०५.२०२६ व दि.३०.०७.२०२६

१०) संचालक (वित्त व लेखा) रा. आ. अ. यांचा प्रस्ताव क्र.राआसोम/एफएमजी/कें.रा.हि. ०२९/२०२६- २७, दिनांक ०७.०८.२०२६

<u>प्रस्तावना :-</u>

केंद्र शासनाने दिनांक ०१.११.२०२१ च्या अर्धशासकीय पत्रान्वये “प्रधानमंत्री आयुष्यमान भारत आरोग्य पायाभूतसुविधा अभियान (PM Ayushman Bharat Health Infrastructure Mission)” ही केंद्र पुरस्कृत योजना राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. प्राथमिक आरोग्य सेवेचे महत्व, आरोग्य शिक्षण आणि प्रतिबंधयासह सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य संस्थांना बळकट करणे, सार्वजनिक आरोग्य प्रशासन संस्था बळकट करणे, तसेच गंभीर काळजी सेवांसह सर्वसमावेशक निदान आणि उपचाराच्या क्षमतेसह सद्याच्या आणि भविष्यातील साथीच्या रोग/ महामारीमुळे उद्भवलेल्या आवाहनांना तोंड देण्यासाठी उपरोक्त कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता आहे.

त्यासाठी ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी आरोग्य सेवा प्रदान सुनिश्चित करण्यासाठी केंद्र शासनाने सन २०२१-२२ ते सन २०२५-२६ या कालावधीकरीता या अभियानास मंजुरी दिली आहे. तसेच केंद्र शासनाकडून सदर योजनेस माहे सप्टेंबर, २०२६ अखेरपर्यंत कालावधीसाठी मुदतवाढ करण्याचे केंद्रीय कार्यालयाचे वाचा संदर्भ क्र.(६) रोजीचे पत्र प्राप्त झाले आहे. त्यानुसार प्रधानमंत्री आयुष्यमान भारत आरोग्य पायाभूतसुविधा अभियान अंतर्गत सामाजिक विशेष घटकाकारीता सन २०२६-२७ मधील मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीमधून ६० टक्के केंद्र हिस्सा लेखाशिर्ष २२१०H५०७, बाब ३१ (सहायक अनुदाने वेतनेत्तर) व बाब ३५ (भांडवली मत्तेच्या निर्मिमितीकरीता अनुदान) व त्यास समरुप ४० टक्के राज्य हिस्सा लेखाशिर्ष २२१०H५१६, बाब ३१ (सहायक अनुदाने वेतनेत्तर) व बाब ३५ (भांडवली मत्तेच्या निर्मिमितीकरीता अनुदान) अनुदान राज्य आरोग्य सोसायटीस वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

प्रधानमंत्री आयुष्यमान भारत आरोग्य पायाभूतसुविधा अभियानतंर्गत सामाजिक विशेष घटकाकारीता सन २०२६-२७ मधील मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदी मधून ६० टक्के केंद्र हिस्सा लेखाशिर्ष २२१०H५०७, बाब ३१ (सहायक अनुदाने वेतनेत्तर) अंतर्गत रु.९९.८९ लक्ष व बाब ३५ (भांडवली मत्तेच्या निर्मितीकरीता अनुदान) अंतर्गत रु.८९७.२२ लक्ष व त्यास समरुप ४० टक्के राज्य हिस्सा लेखाशिर्ष २२१०H५१६, बाब ३१ (सहायक अनुदाने वेतनेत्तर) अंतर्गत रु.६६.५९ लक्ष व बाब ३५ (भांडवली मत्तेच्या निर्मितीकरीता अनुदान) अंतर्गत रु.५९८.१५ लक्ष इतके अनुदान राज्य आरोग्य सोसायटीस वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर निधी वितरणाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:-

(रु.लाखात)

अ क्र	तपशिल	केंद्र व राज्य हिस्सा		
		लेखाशिर्ष	सन २०२६-२७ अर्थसंकल्पिय तरतुद (मुळ+ पुरक)	वितरीत करावयाची रक्कम (केंद्र हिस्सा / राज्य हिस्सा)
१	मागणी क्रं.एन-३, २२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०६ सार्वजनिक आरोग्य ७८९, अनुसूचित जाती विशेष घटक उपयोजना (०१) अनुसूचित जाती उपयोजानांतर्गत योजना (०१)(३०) प्रधानमंत्री आयुष्यमान भारत आरोग्य पायाभूत अभियान (कार्यक्रम) (केंद्र हिस्सा ६० टक्के) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)	२२१०H५०७-३१	६६७.००	९९.८९
२	३५-भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान	२२१०H५०७-३५	५९९९.००	८९७.२२
३	मागणी क्रं.एन-३,	२२१०H५१६-३१	४४४.००	६६.५९

	२२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०६ सार्वजनिक आरोग्य ७८९, अनुसूचित जाती विशेष घटक उपयोजना (०१) अनुसूचित जाती उपयोजानांतर्गत योजना (०१)(३१) प्रधानमंत्री आयुष्यमान भारत आरोग्य पायाभूत अभियान (कार्यक्रम) (राज्य हिस्सा ४० टक्के) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)			
४	३५-भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान	२२१०H५१६-३५	४००००.००	५९८.१५

०२. सदरचा खर्च वरील तक्यात नमूद केल्याप्रमाणे संबंधित लेखाशिर्षाखालील सन २०२६-२७ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा व त्या लेखाशिर्षाखाली खर्ची दाखविण्यात यावा.

०३. उपरोक्त अनुदानासाठी प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी याबाबतचे देयक कोषागारात सादर करुन विहित केलेल्या बाबींवर खर्च करण्यासाठी सदर रक्कम आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटीच्या यांच्याकडे सूपुर्द करावी. यासाठी सहसंचालक (अ. व प्र.), आरोग्य सेवा, मुंबई यांना “नियंत्रण अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे.

०४. वित्त विभागाच्या दिनांक ०९.०४.२०२६ च्या शासन परिपत्रका सोबत जोडलेल्या परिशिष्टातील अनु.क्र.९ मधील मुद्दा क्र.१ ते ९ मधील अटी व शर्तींची पूर्तता केली असल्याचे कार्यक्रम प्रमुख / संचालक (वित्त व लेखा), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांनी शासनास कळविले असून त्याबाबतचे प्रमाणपत्र सादर केले आहे. त्यामुळे सदरहू प्रकरणी वित्त विभागाच्या दिनांक ०९.०४.२०२६ च्या शासन परिपत्रकाच्या परिशिष्ठातील मुद्दा क्र.१ ते ९ मधील अटींची पूर्तता झाली असल्याचे प्रमाणित करण्यात येत आहे.

०५. यापुर्वी वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने राज्य आरोग्य सोसायटीच्या लेखापरिक्षणामध्ये कोणतेही गंभीर आक्षेप घेतलेले नाहीत राज्य आरोग्य सोसायटीने प्रमाणित केलेले आहे.

०६. सदर प्रस्तावावरील वितरीत करण्यात येणारा निधी पुरवठादाराच्या/लाभार्थ्याच्या खात्यात थेट जमा होणार आहे.

सदर प्रस्तावावरील वितरीत करण्यात येणारा निधी योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यात आरोग्य संबंधित औषधे/वस्तू आणि साहित्य हे सन २०२३ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ अंतर्गत दिनांक १७-०३-२०२३ रोजी प्रसिद्ध केलेल्या अधिनियमास अनुसरून महाराष्ट्र वैद्यकीय

वस्तू व सेवा खरेदी प्राधिकरणा मार्फत खरेदी करावयाची असल्याने योजनेचा निधी महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू व सेवा खरेदी प्राधिकरणच्या बँक खात्यामध्ये वळते करून आरोग्य संबंधित औषधे/वस्तू आणि साहित्य खरेदी करण्यात येईल.

०७. सदर कार्यक्रमांच्या संबंधित लेखाशिर्षाखाली एक वर्ष जूने संक्षिप्त देयक प्रलंबित नाही. शासनाच्या धोरणानुसार सदर प्रस्तावावरील निधी भारतीय रिझर्व्ह बँक द्वारे खर्च करण्यात येतो. त्याचप्रमाणे वित्त विभागाच्या दिनांक ०९.०४.२०२६ च्या शासन परिपत्रकातील संबंधित असलेल्या सर्व तरतुदीचे/अटी व शर्तीचे पालन करुन त्यासंदर्भात आवश्यक ते प्रमाणपत्र सादर करणे अथवा आवश्यक त्या बाबी स्वतंत्रपणे प्रमाणित करणे तसेच सदरहू निधी राज्य आरोग्य सोसायटी किंवा ज्या यंत्रणेमार्फत खर्च करण्यात येणार आहे त्या कार्यक्रम प्रमुखास बंधनकारक राहील.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र. मुंविनि-२०२२/प्र.क्र.२७/२०२२/विनियम, दिनांक १२.०१.२०२३ मधील नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून निधी वितरण करण्यात येत आहे.

०८. सदर कार्यक्रमाचा निधी SNA SPARSH प्रणालीद्वारे RBI च्या E-KUBER मार्फत वितरीत करावयाचा असल्याने सदरचे अनुदान बिनशर्त आहे.

०९. प्रस्तुत शासन निर्णय वाचा येथील वित्त विभागाचे परिपत्रक दिनांक ०९.०४.२०२६ दि. ०७.०५.२०२६ व दि.०३.०७.२०२६ तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे परिपत्रक दि.१९.०५.२०२६ व दि.३०.०७.२०२६ मधील तरतूदींच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र.२०२६०८२११४४७३१२६१७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANIL VITHALRAO SAWARE

Digitally signed by ANIL VITHALRAO SAWARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Public Health Department, 2.5.4.20=073348B7A8767F0F7865422DF1E65CE2F3BCDF6786E4712E2C088A9AC4FFEE3F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1C7875BFBCCDB94828A5028954F06ED28EC75FD43053DB3AE8254FA5A5D14A57, cn=ANIL VITHALRAO SAWARE
Date: 2026.08.21 17:21:24 +05'30'

(अनिल वि.सावरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
२. महालेखापाल, (लेखा परिक्षा), महाराष्ट्र- १, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर.
३. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.

४. संचालक-१, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
५. संचालक-२, आरोग्य सेवा, पुणे
६. संचालक, (वित्त व लेखा), राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
७. अति. संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पूणे
८. सहसंचालक (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा, पुणे
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०.निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
११.सामाजिक न्याय व विशेष सहायक विभाग, मंत्रालय, मुंबई
१२.वित्त विभाग (अर्थसंकल्प/व्यय-१३), मंत्रालय, मुंबई.
१३.अवर सचिव (अर्थसंकल्प व लेखा) सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१४.निवडनस्ती (एनएचएम) ....